# छत्रपती शाहू महाराज यांचा शैक्षणिक विकासाच्या दृष्टीकोण आणि सामजिक न्याय

**प्रा.डॉ.टी.एम.पाटील , राज्यशास्त्र विभागप्रमुख,सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड**

**प्रस्तावना :**

ज्या समाजात बहुजनांना शिक्षणापासून पूर्ण वंचित ठेवले जाते, त्या समाजात एक विशिष्ट वर्गाची मक्तेदारी समजावर दिसून येते. या वर्गाने शिक्षणाचे सामर्थ्य जाणून या शिक्षणावर आपले अधिपत्य निर्माण करतात कारण यामुळे समाजाच्या सर्वच क्षेत्रात खऱ्या अर्थाने "सत्ता' राखता येते. महाराष्ट्रात १९ व्या शतका पर्यंत बहुजन वर्ग शिक्षणापासून पूर्णपणे वंचित ठेवण्यात तथाकथित अभिजनांना यश लाभले होते. पण महाराष्ट्रातील ब्रिटीश सत्तेने शिक्षणाची दारे उघडी केली. त्याच वेळी महात्मा फुले यांनी शिक्षणाची गंगा बहुजन समजा पर्यंत यावी यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांनी ब्राह्मणांच्या विरोधाला न जुमानता ब्रिटीशांच्या सहकार्याने इंग्रजीचे ज्ञान संपादिले होते. ब्रिटीश सरकारला प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची मागणी केली. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी राजषी शाहू महाराज यांनी महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवून आपल्या राज्यात व्यापक असे शैक्षणिक धोरण राबविले. ब्राम्हण वर्गांच्या मक्तेदारोबर पहिला प्रभावी व परिणामकारक प्रहार केला. ५०% आरक्षणाची भारतात मुहूर्तमेढ रोबली. शाहू महाराजांच्या विचारांचा, कर्तृत्वाचा व मनाचा केंद्रबिदू होता आपल्या रयतेचे शिक्षण, आणि त्यातल्या-त्यात ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाकडे स्वतः जातीने महाराजांनी लक्ष देऊन सामजिक न्याय निर्माण केला आहे.

**उद्देश:**

१. राजर्षी शाहू महाराज यांची शैक्षणिक विचारधाराचा अभ्यास करणे
२. राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थात केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे
३. राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणाच्या माध्यातून समाजात सामाजिक न्याय स्थापने साठी केलेल्या प्रयत्नाचा अभ्यास करणे .

**राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासाचा दृष्टीकोण :**

राजर्षी शाहू महाराजा यांनी बहुजन समाजाच्या विकासासाठी आपले तन-मन-धन वेचून महात्मा फुलेंपासून सुरू झालेल्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीला खतपाणी घालून बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाला त्यांनी हातभार लावला आणि लोकांचा राजा त्यांची ओळख निर्माण झाली. शिक्षण काही ठरावीक वर्गाची मक्तेदारी नाही, असे सांगून राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाचा प्रसार बहुजन समाजामध्ये अग्रक्रमाने केला. आपली प्रजा सुबुद्ध व्हावी, जागृत व्हावी, तिने राज्यकारभार करण्यास सहकार्य करावे. प्रजाजनांनी आपल्या उद्धारासाठी स्वतःच्या पायावर उभे रहावे, या हेतूने प्रेरीत होऊन राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये ज्ञानज्योत पेटविली. वस्त्र, वित्त, विद्या आणि स्वाभिमानाला मुकलेल्या अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्तता करून त्यांना मानवी स्वातंत्र्याचे हक्क देणारी घोषणा हिंदुस्थानच्या इतिहासातच तोपर्यंत दुसऱ्या कोणत्याही राजाने आपल्या राज्यात केली नव्हती. अशा या पददलितांना, बहुजनांना माणुसकीस मुकलेल्या अस्पृश्यांना मानवी हक्क मिळवून दिले. जातिभेद मोडणे हे तर महाराजांचे खरे ध्येय होते. राजर्षी विचारात, आचरणात, कृतीत-नि-प्रचारात उद्धाराचा कळवळा महात्मा फुले यांच्या इतकाच जवळीकतेचा होता. (आढाव विलास : "माणसातील राजा, राजामधील माणूस', दै. सामना दिनांक २७-०६-२००२.)

राजर्षी शाहू महाराजांनी ध्येयवादी दृष्टिकोनातून व नियोजनपूर्वक केलेल्या बहुविध व सर्वकष सुधारणांमुळेकोल्हापूर संस्थानातील जनतेच्या जीवनावर दूरगामी परिणाम झाले आणि त्याचबरोबर महाराष्ट्रातील जनतेमध्येदेखील सामाजिक क्रांती घडून येण्यास सुरूवात झाली. त्यांनी प्रशासन, शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यास तातडीने सुरूवात केली. त्या सर्व सुधारणांमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्राचे महत्व सुरुवातीपासूनच ओळखले होते. अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणून ते चिरस्थायी करण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी माध्यम असल्याने त्याच्या विकासासाठी व ते सर्व जनतेपर्यंत पोहचवण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. त्यांनी शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणायचा व बहुजन समाजातील स्त्री-पुरूष, अस्पृश्य समाज यांना शिक्षणाचे द्वार खुले करून देण्यासाठी संस्थानाच्या माध्यमातून कार्य सुरु केले. त्यांच्या मते सर्वांगीण प्रगतीचा पाया, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम, प्रशासकीय सुधारणांपूवीची आवश्यक बाब म्हणून शिक्षणाचे महत्व अधिक आहे. यादृष्टीने त्यांनी कोल्हापूर संस्थानात विविध प्रकारच्या व वेगवेगळया स्तरांव रच्या शिक्षण संस्थांची स्थापना करून नवनवीन अभ्यासक्रमांची सुरूवात करून आणि विद्यार्थ्यांना मुबलक प्रमाणात सवलती देऊन कोल्हापूर संस्थानात शिक्षण प्रसाराला चालना दिली. तसेच विविध जाती-जमातींच्या विद्यार्थ्याच्या राहण्या-जेवण्याची पर्याप्त व्यवस्था करून त्यांच्या शिक्षण घेण्याच्या मार्गातील अडचणी दूर करण्यासाठी कोल्हापूर शहरात विद्यार्थी वसतिगृहांची अभिनव मोहीम सुरू करणे आणि कोल्हापूर संस्थानाबाहेरील विविध प्रकारच्या शिक्षण संस्थांना आधिक व इतर साहाय्य देऊन त्यांना कार्यरत करण्यास सदैव मदत करण्याचे धोरण अवलंबले.

शिक्षणाबरोबरच "सर्वांगीण शिक्षण' ही संकल्पना राजर्षी शाहू महाराजांनी मांडली. समाजाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी केवळ शिक्षण महत्त्वाचे नसून विविधांगी शिक्षणाची गरज असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी गायन, वैद्यकोय शिक्षण, चित्रकला, शिल्पकला, बकिली शिक्षण, मल्लविद्या, नाट्य शिक्षण, नृत्य शिक्षण, औद्योगिक शिक्षण यांसारख्या शिक्षणाच्या सोयी

निर्माण केल्या. यासाठी देशातील कानाकोपऱ्यातील तज्ज्ञांना करवीर नगरीत सन्मानाने बोलाविले. आज या करवीर नगरीला देशामध्ये मानाचे स्थान निर्माण झाले. या पाठीमागे राजर्षी शाहू महाराजांचे विचार, कार्यपद्धती कारणीभूत आहे. शिक्षणाविषयीची तळमळ व त्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळेच या परिसराचा मोठा विकास झाला आहे. शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना तसेच राज्यकर्त्यांना छत्रपतींचे हे शैक्षणिक धोरण प्रेरणादायी ठरलेले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी केवळ वसतिगृह आणि शिक्षण संस्था उघडल्या नाहीत. त्यांनी शिक्षणाचा मूलभूत विचार महाराष्ट्राला दिलेला आहे. आर्थिक हलाखीतील लोकांच्या मुलांना फी माफ केल्याशिवाय शिक्षणप्रसार होऊ शकत नाही, हे राजर्षी शाहू महाराजांनी पूर्णपणे ओळखले होते. त्यासाठी २० मे, १९११ रोजी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांना फी माफ करण्याचे धोरण अवलंबिले. प्रत्येक शाळेतील शेकडा पंधरा मुलांना फी माफी देण्याची राजाज्ञा केली. मुलांच्या शिक्षणासोबतच मुलींच्या शिक्षणाची सोय केल्याचे आढळून येते. १९१९ सालच्या ६ ऑक्टोबरचा पुढील आदेश, "तमाम लोकांस जाहीर करण्यात येते की, ज्यांच्यात पडदा पाळण्याची रीत नाही आणि ज्यांच्यातील मुलींना व स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे, त्या-त्या विद्यार्थिनींची राहण्याची, जेवण्याची व शालेय फो-पुस्तकांची वगैरे सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल. चांभार, महार, मांग, ढोर आदी अस्पृश्य समाजातील मुलींना शिक्षण देण्यासाठी राजषी शाहू महाराजांनी एक सेविका नेमली होती. मुलींना शिष्यवृत्ती देण्याची राजाज्ञा काढली. करवीर राज्यात १९२२ साली मुलींच्या ३३ शाळा असल्याचे दिसून येते. यात २००० मुली शिकत होत्या. उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शाळांच्या शिक्षणाकडे राजषी शाहू महाराजांचे अधिक लक्ष होते. बहुजन समाजात बौद्धिक जागृती करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन शाहू राजाने आमच्या हाती दिलेले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजातील मुला-मुलींसाठी वेगवेगळ्या शैक्षणिक मोहिमा राबविल्या. महाराजांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा २९ सप्टेंबर १९१७ रोजी केला. गाव तेथे शाळा' सुरू करून शिक्षणाची गंगोत्री बहुजन समजापर्यंत पोहचवाण्याचे कार्य केले.याचबरोबर होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, त्यांना शिक्षणाचो मोफत सोय करून देणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात राहता यावे म्हणन वसतिगृह उपलब्ध करून देणे, मागासलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीत आरक्षण देणे, या सर्व बाबींसाठी राजषी शाहू महाराजांनी "शिक्षण सुधार समिती' स्थापन केली होती. याचबरोबर ग्रंथालय परिपूर्ण शाळा, गाव तेथे शाळा हौ मोहीम उघडली होती. केवळ सुरूच केली नाही तर तेथे प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करून ग्रंथालय सुरू केले.

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण ही समतेची चाबी आहे, हे राजर्षी शाहू महाराजांनी पुरेपूर ओळखले होते. त्याशिवाय व्यक्तीचा, समाजाचा व राष्ट्राचा विकास होणार नाही ही जाणीव त्यांच्या शैक्षिणक कार्यामागे होती. म्हणून त्यांनी शिक्षणावर जास्तीतजास्त खर्च केला. त्यांनी शिक्षणाची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी वेगवेगळे कायदे करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचा करणारा कायदा केला. त्यांनी याद्वारे विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मोडण्यासाठी, कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक प्रसाराच्या माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापित केली.

सारांश :

सामाजिक न्यायापासून वंचित असलेल्या बहुजन वर्ग व स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देवून मुला मुलींना शिक्षण कालावधीत विद्यावेतन देणाऱ्या शाहूंचा मूळ उद्देश शिक्षणातून बहुजन समाजाचा आणि स्त्री-उद्धार हाच होता. त्यांच्या कार्यामुळे बहुजन व दलित समाजाला सामाजिक व्यवस्थेत सनमानाने जगणायचा मार्ग प्राप्त झाला. मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती व वसतिगृहाची उपलब्धी या सर्व बाबींमुळे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे धोरण बऱ्याचशा बाबतीत सफल झाले. ही बाब सामाजिक न्यायाच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण आहे. आज शिक्षणावर होणारा अत्यल्प खर्च पहाता कोल्हापूर संस्थानात एकूण उत्पन्नाच्या २३% इतका खर्च शाहूंनी करणे ही बाब वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वपूर्ण स्वरूपाची आहे. राजर्षी शाहू महाराजांनी अंगीकारलेल्या समताधिष्ठित, सामाजिक न्यायाने, समतोल, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास या धोरणाची आजही देशाला गरज असल्याचे सद्य स्थितील शिक्षणाच्या व्यवस्थेवरून प्रकर्षाने जाणवते.

संदर्भ सूची :

१. लड्ठे आबा, "श्री. शाहू छत्रपती यांचे चरित्र", टाईम्स ऑफ इंडिया प्रेस, मुंबई

२. डॉ. भोसले एस.एस., "राजषी शाहू: काळ, विचार आणि कार्य.", कोल्हापूर जिल्हा परिषद, १९७५,

३. डॉ. खरात संभाजी , "राजर्षी शाहूंचे शेक्षणिक धोरण", दै. एकमत, दिनांक २६-०७-२००२.

४. प्रा. आढाव विलास,"माणसातील राजा, राजामधील माणूस", दै. सामना दिनांक २७-०६-२००२.

५. प्रा. कडवे रघुनाथ, "लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज", शशी प्रकाशन, गणेशनगर, बोरगाव मेघे, ता.जि. वर्धा, द्वितीय आवृत्ती,